CIDCO WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. ०६.१२.२०१९**

# सिडकोच्या ई-लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री करण्यात आलेल्या ऐरोली आणि वाशी येथील भूखंडांस प्राप्त झाले विक्रमी दर

सिडको महामंडळातर्फे ई-लिलाव प्रक्रियेद्वारे ऐरोली व वाशी येथील पाच भूखंडांच्या विक्री करण्याच्या योजनेस निविदाकारांचा उत्तम प्रतिसाद लाभून सर्व भूखंडांची विक्रमी दराने विक्री करण्यात आली आहे. सदर विक्रीतून सिडको महामंडळाच्या तिजोरीत अंदाजे २२९ कोटी रूपयांची भर पडली आहे. योजना पुस्तिकेतील वेळापत्रकानुसार दि. ०६ डिसेंबर २०१९ रोजी सिडको भवन येथे संपूर्ण प्रक्रिया अतिशय पारदर्शक पद्धतीने पार पडली. प्राप्त झालेल्या ई-निविदा निविदादारांच्या समोर ऑनलाईन माध्यमातून उघडण्यात आल्या व ई-लिलाव प्रक्रियेमधील बोलींची तुलना करण्यात येऊन यशस्वी निविदाकारांची नावे जाहीर करण्यात आली.

ऐरोली येथील भूखंड क्र. १७ व २६ करीता **रु. ६६,९१७ प्रति चौ. मी.** तर भूखंड क्र. ६१ करीता **रु. ५०,४०० प्रति चौ. मी.** इतका आधारभूत दर निश्चित करण्यात आला होता. वाशी येथील भूखंड क्र. ३-१ ए करीता **रु. १,१३,८४६ प्रति चौ. मी.** व भूखंड क्र. ३-१ सी करीता **रु. ९२,७६३ प्रति चौ. मी.** इतका आधारभूत दर निश्चित करण्यात आला होता. बंद निविदेमध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली किंवा ई-लिलावामध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली यांपैकी जी बोली जास्त रकमेची असेल ती बोली स्वीकारण्याचा निकष निश्चित करण्यात आला होता. या निकषानुसार सदर सर्व भूखंडांकरिता ई-लिलाव प्रक्रियेमध्ये उद्धृत करण्यात आलेली सर्वाधिक रकमेची बोली स्वीकारण्यात येऊन संबंधित अर्जदारांना यशस्वी म्हणून घोषित करण्यात आले. भूखंडांच्या आधारभूत दरांपेक्षा या बोली सरासरी दुपटीने अधिक आहेत. ऐरोली येथील भूखंड क्र. १७ करीता श्रीनाथजी ऑर्गनायझर्स प्रा. लि. यांच्यातर्फे उद्धृत करण्यात आलेली **रु. २,६७,७८६ प्रति चौ. मी.** ही महत्तम बोली ठरली.

ई-लिलाव व ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत अर्ज नोंदणी, अनामत रकमेचा भरणा, निविदा भरणे या सर्व प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व जलद अशा ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आल्या. यामध्ये ऑनलाईन बंद निविदा सादर करणे निविदाकारांना अनिवार्य होते. बंद निविदा सादर करणाऱ्या निविदाकारांनाच पुढील टप्प्यातील ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार होते.

सदर योजने अंतर्गत ऐरोली येथील सेक्टर-७ मधील भूखंड क्र. १७, सेक्टर-८ मधील भूखंड क्र. २६, व सेक्टर-१९ मधील भूखंड क्र. ६१ आणि वाशी येथील सेक्टर-१८ मधील भूखंड क्र. ३-१ए व ३-१सी हे

भूखंड भाडेपट्ट्यावर उपलब्ध करून देण्यात आले होते. ऐरोली येथील भूखंड क्र. १७ व २६ हे निवासी + वाणिज्यिक तर भूखंड क्र. ६१ हा निवासी वापराकरिता उपलब्ध होता. वाशी येथील दोन्ही भूखंड हे वाणिज्यिक वापराकरिता उपलब्ध होते. ऐरोली येथील भूखंड क्र. १७ चे क्षेत्रफळ १५६० चौ.मी. व भूखंड क्र. २६ चे क्षेत्रफळ १७९६.९१ चौ.मी. तर सदर दोन्ही भूखंडांचा चटई क्षेत्र निर्देशांक १.०० इतका होता. ऐरोली येथील भूखंड क्र. ६१ चे क्षेत्रफळ १९६९.६८ चौ.मी. व चटई क्षेत्र निर्देशांक १.० इतका होता. वाशी येथील भूखंड क्र. ३-१ए चे क्षेत्रफळ ३८५०.६३ चौ.मी. व भूखंड क्र. ३-१सी चे क्षेत्रफळ ३८४६.३२ चौ.मी. तर सदर दोन्ही भूखंडांचा चटई क्षेत्र निर्देशांक १.५ इतका होता.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**